# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 13.09.2026** **वार : रविवार**

---

## <u>ठळक बातम्या</u>

1. 18व्या ब्रिक्स शिखर परिषदेत 'नवी दिल्ली जाहीरनाम्या'ला एकमतानं स्वीकृती.
2. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी कटिबद्ध असल्याचा ब्रिक्स सदस्य देशांचा पुनरुच्चार.
3. पश्चिम बंगालमध्ये क्षेपणास्त्र चाचणी केंद्र उभारण्याच्या प्रस्तावाला मंजूरी.
4. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेग कमी करण्याचं तज्ज्ञांचं आवाहन.
5. अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात एलेना रायबाकिना विजयी.
6. महिला टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत-श्रीलंका यांच्यात अंतिम लढत.

## <u>सविस्तर बातम्या</u>

### <u>ब्रिक्स परिषद</u>

18व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी एकमतानं स्वीकारण्यात आलेल्या 'नवी दिल्ली जाहीरनाम्या'मध्ये, नेत्यांनी जागतिक पातळीवरील महत्त्वाच्या मुद्द्यांवर विविध देशांचे दृष्टिकोन आणि भूमिकांचा आदर करणाऱ्या बहुपक्षीय दृष्टिकोनाचा पुरस्कार केला आहे. शाश्वत विकास, भूक आणि गरिबीचं निर्मूलन तसंच हवामान बदलांना तोंड देण्यासाठी जागतिक पातळीवर करण्यात येत असलेल्या प्रयत्नांमध्ये योगदान देणे अशा या मुद्द्यांचा यामध्ये समावेश आहे.

ब्रिक्स शिखर परिषदेमध्ये स्वीकारण्यात आलेला नवी दिल्ली जाहीरनामा सदस्य देशांच्या सामायिक संकल्पासाठी स्पष्ट दिशा प्रदान करणारा असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समारोपाच्या भाषणात नमूद केलं. या जाहीरनाम्यातील ठरावांचे प्रत्यक्ष परिणामांमध्ये रूपांतर करणं ही आता ब्रिक्स देशांची सामायिक जबाबदारी आहे असं ते म्हणाले...

***आज की चर्चा से स्पष्ट है कि बदलते हुए विश्व का संचालन पुराने संस्थानों से नहीं किया जा सकता। रिप्रेजेंटेशन, रिस्पांसिवनेस और रूल मेकिंग तीनों में सुधार आवश्यक है। आज एडॉप्ट किया गया न्यू दिल्ली डिक्लेरेशन हमारे साझा संकल्प को स्पष्ट दिशा देता है। अब हमारी जिम्मेदारी है कि इन संकल्पों को ठोस परिणामों में बदलें।***

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाबाबतही ब्रिक्स सदस्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. पश्चिम आशियामध्ये दीर्घकालीन शांतता, सुरक्षा आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यास मदत होईल असा दीर्घकालीन तोडगा काढण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून प्रयत्न वाढवण्याचं त्यांनी आवाहन केलं. गेल्या वर्षी 22 एप्रिलला जम्मू-काश्मीरमध्ये पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा नेत्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचा स्पष्ट पुनरुच्चार देखील ब्रिक्स सदस्यांनी केला.

तत्पूर्वी काल दुपारी नवी दिल्लीतील 'भारत मंडपम' इथं 2026 च्या ब्रिक्स शिखर परिषदेला सुरुवात झाली. दरवर्षी अध्यक्षपद बदलत असूनही या गटाची संस्थात्मक गती कायम राखली जावी, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या प्रस्तावनापर भाषणात 'ब्रिक्स सातत्य आणि अंमलबजावणी यंत्रणा' स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. ते म्हणाले...

***अब समय है कि हम ब्रिक्स में हमारी एकता और सहमति को वैश्विक मंच पर ठोस परिणामों में बदलें। अगले 20 वर्षों के लिए हमें एक नये और एंबीशियस एजेंडा पर काम करना होगा। इसकी शुरूआत हमें अपने खुद के वर्किंग सिस्टम से करनी होगी। ब्रिक्स की अध्यक्षता हर वर्ष बदलती है किन्तु इसकी वजह से हमारा इंस्टीट्यूशनल मोमेंटम नहीं रुकना चाहिए।***

ब्रिक्स देशांना पुढील 20 वर्षांसाठी नवीन आणि महत्त्वाकांक्षी कार्यसूचीवर काम करणं आवश्यक असल्याचं पंतप्रधान म्हणाले. तसंच, कठीण प्रसंगी मदत मिळवणे सुलभ व्हावं यासाठी संबंधित देशांचं सागरी प्रशासन आणि राजनैतिक दूतावास यांच्याशी संपर्क साधण्यासाठी 'नाविक आपत्कालीन सहाय्य जाळे' स्थापन करण्याचा प्रस्तावही पंतप्रधानांनी मांडला.

**ब्रिक्स-सांस्कृतिक कार्यक्रम**

ब्रिक्स शिखर परिषदेसाठी नवी दिल्लीत आलेल्या विविध देशांच्या नेत्यांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल भारत मंडपम इथं विशेष सह-भोजन समारंभाचं आयोजन केलं होतं. यावेळी 'नवरसा- सामायिक भावनांचं विश्व' नावाचा एक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात ब्रिक्स देशांतील विविध वाद्ये सादर करण्यात आली तसंच भारताच्या शास्त्रीय नृत्य कला प्रकारांचं सादरीकरण करण्यात आलं.

**ब्रिक्स-द्विपक्षीय संवाद**

ब्रिक्स परिषदेचा आज दुसरा आणि अंतिम दिवस आहे. अनकूलन, नाविन्य, सहकार्य आणि शाश्वतता-सर्वसमावेशक जागतिक विकासासाठी भविष्याची जडणघडण या विषयावर ही परिषद होत आहे. आज होणाऱ्या सत्रात सदस्य देशांसह बेलारूस, बोलिव्हिया, कझाकस्तान, क्युबा, मलेशिया, नायजेरिया, थायलंड, युगांडा, उझबेकिस्तान आणि व्हिएतनाम हे 10 देश सहभागी होणार आहेत. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी, कझाकस्तान, फिलीपिन्स, इजिप्त, दक्षिण अफ्रिका आणि बुरूंडी या देशांच्या राष्ट्राध्यक्षांशी

द्विपक्षीय संवाद साधणार आहेत. नायजेरिया आणि युगांडा या देशांच्या उप-पंतप्रधानांबरोबरही ते बैठक घेणार आहेत.

तत्पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात काल द्विपक्षीय बैठक झाली. भारत आणि चीनने आपल्या संबंधांकडे धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहण्याची आवश्यकतेवर दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली.

**अमित शहा-मुंबई दौरा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तीन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात, ते आज बीकेसीमध्ये एका पुरस्कार सोहळ्याला उपस्थित राहतील.एशियाटिक सोसायटीलाही ते भेट देणार आहेत. तसंच नवी मुंबईत उद्या होणाऱ्या सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनालाही शहा उपस्थित राहाणार आहेत. याशिवाय गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ते लालबागच्या राजाचं दर्शन घेणार आहेत.

**गणेशोत्सव तयारी**

दरम्यान उद्यापासून सुरू होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मुंबई पुण्यासह सर्वत्र जय्यत तयारी सुरू आहे. बाजारपेठांमध्येही पूजा साहित्य, आणि सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी दिसून येत आहे .

**क्षेपणास्त्र चाचणी केंद्र**

पश्चिम बंगालमध्ये शस्त्र आणि क्षेपणास्त्र चाचणी केंद्र उभारण्याच्या डीआरडीओच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प पश्चिम बंगालच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल, तसंच देशाच्या संरक्षण क्षेत्रातील चाचणी क्षमतांना बळकटी देईल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पश्चिम बंगालमधल्या पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील जुनपुर या किनारी गावात हे चाचणी केंद्र उभारण्यात येणार आहे.

**अँथ्रोपिक**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील विकासाचा वेग काहीसा कमी करण्याचं आवाहन अँथ्रोपिक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डारिओ अमोडेई यांनी केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास सुरूच राहायला हवा. मात्र त्यातून निर्माण होणारे धोके गंभीर असून, त्यावर आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यासाठी कंपन्या आणि सरकारांना वेळ देण्याची आवश्यकता असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. ओपनएआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी सॅम ऑल्टमन आणि एक्सएआयचे प्रमुख इलॉन मस्क यांनीही अमोडेई यांच्या आवाहनाला पाठिंबा दर्शवला आहे. दरम्यान, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या संभाव्य गैरवापराबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. आत्ताच मजबूत सुरक्षा उपाय लागू केले नाहीत तर पुढील सहा ते बारा महिन्यांत AI इंटरनेटवर नियंत्रण मिळवण्यासही सक्षम होऊ शकतं अशी भिती व्यक्त होत आहे.

**नेपाळ**

नेपाळममधल्या पुर दुर्घटनेतील मृतांची संख्या 1 हजार 386 वर पोहोचली असून,अजूनही सुमारे 5 हजार 130 लोक बेपत्ता असल्याचं वृत्त आहे. सुरक्षा दलांकडून शोध आणि बचाव कार्य सुरूच आहे. आतापर्यंत

13 हजार 700 हून अधिक लोकांची सुटका करण्यात आली आहे, तर 339 जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<u>टेनिस</u>**

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात एलेना रायबाकिनानं आर्यना सबालेन्काचा 6-4, 5-7, 6-2 असा पराभव केला. रायबाकिनाचं हे पहिलंच यूएस ओपन विजेतेपद आहे. या विजयामुळं तिनं जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावलं आहे. तत्पूर्वी, अमेरिकेच्या ख्रिश्चन हॅरिसन आणि ब्रिटनच्या नील स्कुपस्की या जोडीनं जर्मनीच्या केविन क्राविट्झ आणि टिम पुएट्झ यांचा पराभव करून पुरुष दुहेरीचं विजेतेपद जिंकलं. तर पुरुष एकेरीची अंतिम फेरी आज रात्री न्यूयॉर्कमध्ये जर्मनीचा अलेक्झांडर झ्वेरेव्ह आणि अमेरिकेचा बेन शेल्टन यांच्यात होईल.

**<u>क्रिकेट</u>**

दुबईत आज होणाऱ्या महिलांच्या टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताचा सामना गतविजेत्या श्रीलंकेशी होणार आहे. हा अंतिम सामना भारतीय वेळेनुसार रात्री ८ वाजता सुरू होईल. सात वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघानं 'अ' गटामध्ये तीन विजय मिळवून अव्वल स्थान गाठलं आणि त्यानंतर उपांत्य फेरीत बांगलादेशचा 40 धावांनी पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.

महिला आशिया चषकाच्या इतिहासात 7 विजेतेपदांसह भारत हा सर्वाधिक वेळा यशस्वी संघ ठरला आहे तर श्रीलंकेनं याआधी 2024 च्या अंतिम सामन्यात भारताचा पराभव करून आपलं पहिलं आशिया चषक विजेतेपद पटकावलं होतं.

**<u>क्रिकेट</u>**

भारत-अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेला आज सुरुवात होणार आहे. पहिला सामना दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियमवर संध्याकाळी 7 वाजता सुरू होईल. दुसरा सामना मंगळवारी, तर तिसरा आणि अंतिम सामना गुरुवारी होणार आहे. भारतीय संघाचं नेतृत्व श्रेयस अय्यर करणार आहे, तर तिलक वर्मा याच्यावर उपकर्णधार पदाची जबाबदारी आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान विभागानं आज देशातल्या अनेक भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.